बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२२३ ■ शनिवार २४ मे २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


सेंद्रिय जांभुळ
संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३१६, २३८३१६

# सभापती शिंदे म्हणतात पी.ए. निलंबीत खोतकर म्हणतात पी.ए. तेथे नव्हताच

**धुळे, दि.२३- धुळ्यातील गुलमोहर या शासकीय विश्रामगृहावर पैसे सापडलेल्या घटनेशी अंदाज समितीचा काहीही संबंध नाही. तसेच पैसे सापडलेल्या खोलीत माझे स्विय सहायक किशोर पाटील राहत नव्हते. समितीवर झालेले आरोप बिनबुडाचे आहेत. आरोप झाल्यानंतरही समितीने धुळे-नंदुरबार जिल्हयातील तीन गावांना भेटी देवुन कामांची पाहणी केली. शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कामे होत आहेत, असे स्पष्टीकरण अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांनी धुळ्यात दिले. खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली धुळयात अंदाज समितीची बैठक झाली. आदिवासी विकास विभागाच्या योजनांची अंमलबजावणी संवेदनशीलपणे करावी, अशा सुचना संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्याचे खोतकर यांनी सांगितले. दरम्यान, विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी खोतकर यांचा स्विय सहायक किशोर पाटीलला निलंबित केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची उलट-सुलट चर्चा होवु लागली आहे.**

विधीमंडळाची अंदाज समिती २१ मेस जिल्हा दौऱ्यावर आली. समितीच्या एकुण सदस्यांपैकी ११ सदस्य आणि काही अधिकारी जिल्हयात आले. समितीची बैठक एका खासगी हॉटेलच्या सभागृहात सुरू झाली. त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी संतोषी माता मंदिर चौकातील गुलमोहर

## बेहिशोबी रक्कम प्रकरण

या शासकीय विश्राम गृहावर खोली क्रमांक १०२ मध्ये साडेपाच कोटी रूपये आहेत, असा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला. कार्यकर्त्यांना घेवुन गोटे यांनी ठाण मांडले. त्यानंतर बुधवारी रात्री अकराच्या सुमारास पोलिस आणि महसुल विभागातील वरीष्ठ अधिकारी विश्राम गृहावर पोहचले. (पान ४ वर)

## ८४ च्या फेऱ्यात अनेक अडकणार

धुळे शहरातील गुलमोहर या शासकीय विश्रामगृहात २२ मेस रात्री सापडलेल्या एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रूपये प्रकरणी जिल्हा पोलिस प्रमुख श्रीकांत धिवरे यांनी आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी जे. पी. स्वामी यांची भेट घेऊन चर्चा केली. या प्रकरणी पोलिसांनी काही जणांचे जबाब नोंदविण्यास सुरूवात झाली आहे. त्यात सार्वजनिक बांधकाम (पान ४ वर)


## रविवारी मान्सून केरळात दाखल होणार

पुणे, दि.२३- भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या मान्सूनसंदर्भात अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार यंदा मान्सून वेळेआधीच रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार सध्या मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या २५ मे पर्यंत मान्सून हा केरळच्या किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो. गेल्या वर्षी ३० मार्च रोजी मान्सूनची केरळमध्ये एन्ट्री झाली होती. मात्र यंदा वेळेपूर्वीच म्हणजे २५ तारखेला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ साली केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला होता, त्यानंतर (पान ४ वर)

# मुसळधार पावसाची शक्यता; महावितरण हाय अलर्टवर सुरळीत विजेसाठी युद्धपातळीवर सज्जता : लोकेश चंद्र

**मुंबई, दि.२३- अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे.**

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी राज्यातील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास



सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले. व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या या बैठकीमध्ये संचालक (संचालन) सचिन तालेवार यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली. दरम्यान, शुक्रवारपासून मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले की, वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व (पान ४ वर)

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या एसआयटी फंड्यांवर वेडा माणूसच विश्वास ठेऊ शकतो : अनिल गोटे

**धुळे, दि. २३ (प्रतिनिधी) : धुळ्यातील शासकीय विश्रामगृहावर सापडलेल्या एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रूपयांचे प्रकरण सरकारने गांभीर्याने घेतले आहे. विधानसभेच्या अस्मितेचा प्रश्न आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास एसआयटी करेल, असे जाहीर केले आहे. पुर्वीची परिस्थिती पहाता फडणवीस यांच्यावर फक्त वेडा माणूसच विश्वास ठेवू शकतो, असे म्हणत माजी आमदार अनिल गोटे यांनी**



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. यासंबंधी गोटे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईकांपासून एकनाथ शिंदे यांच्या पर्यंतचे सर्व मुख्यमंत्री मी पाहिले आहेत. आजवरचा अनुभव पहाता, भ्रष्टाचाराला शासनाची मान्यता आहे आणि संरक्षण आहे, अशी माझी खात्री झाली आहे.**

धुळ्यात २१ मेस रात्री शासकीय विश्रामगृहावर एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रूपये सापडलेत. ही रक्कम ज्या खोलीत सापडली, त्या खोलीत अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील होते, असा दावा गोटे यांचा आहे. यासंबंधी आज गोटे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या गैरव्यवहाराची चौकशी एसआयटी कडून करण्यात (पान ४ वर)

## खासदार डॉ.शोभा बच्छाव यांच्या प्रयत्नांना यश

# तापी परियोजनेसह, अक्कलपाडा योजना भाग दोन प्रकाशा बुराई योजना लवकरच पूर्णत्वास येणार

**धुळे, दि.२३- धुळे महानगरपालिका अंतर्गत जीर्ण झालेली तापी जलवाहिनी, अक्कलपाडा भाग आणि प्रकाशा बुराई योजना या सर्व प्रकल्पांचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याच्या सूचना धुळे पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता संदीप सोनवणे आणि मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांना खा.डॉ.शोभा बच्छाव यांनी दिल्या होत्या. हे प्रस्ताव वेळीच प्राप्त झाल्याने तापी जलवाहिनी, अक्कलपाडा भाग२ आणि प्रकाशा बुराई योजना या सर्व प्रकल्पांचे प्रस्ताव घेवून खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी दिल्ली येथे जलशक्ती मंत्रालयाचे ना. सी.आर. पाटील यांच्याकडे सादर केले. त्या अनुषंगाने दि. २२ रोजी डिमांड फॉर ग्रॅण्डसाठी अर्थातच निधी मागणीसाठीच्या बैठकत तापी परियोजनेसह, अक्कलपाडा योजना भाग-२ आणि प्रकाशा बुराई योजना पूर्णत्वास येण्यासाठी भरघोस निधी मंजुरीस ना.सी.आर.पाटील यांनी हिरवा कंदील दाखविला. खा.डॉ.शोभा बच्छाव यांच्या प्रयत्नांना यश आल्याने पाण्याची समस्या मार्गी लाणार आहे.**

धुळे शहराची वाढती लोकसंख्या आणि



हद्दवाढ गावांतील समावेश यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. तापी पाणीपुरवठा योजना वर्षांपुर्वी कार्यान्वित करण्यात आली होती. या योजनेची पाईपलाईन जिर्ण झाल्याने तिला गळती लागली आहे. या गळतीमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असतो. तापीतून धुळ्याला पाणीपुरवठा करणारी चाळीसा कि.मी. लांबीची जलवाहिनी नव्याने करण्याची गरज आहे. दुसरे असे कि, अक्कलपाडा धरण पुर्ण झाले असले तरी भुमी अधिग्रहणामुळे केवळ ६५ टक्केच धरण भरले जाते. अक्कलपाडा धरण हे १०० टक्के धरण भरण्यासाठी २०० हेक्टर जमीन अधिग्रहण करावी लागणार आहे. तसेच शिंदखेडा व नंदुरबार तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी प्रकाशा-बुराई उपसा सिंचन योजना वरदान ठरणारी आहे. या योजनेचे काम सुरू करून विक्रमी वेळेत हा प्रकल्प पूर्ण करावा आणि दुष्काळग्रस्त भागाला दिलासा द्यावा अशी मागणी आहे. या योजनेमुळे अवर्षणप्रवण २८ गावांना सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची सोय होणार असून ७ हजार ८५ हेक्टर जमीन ओलीता खाली येणार आहे. अवर्षणग्रस्त असलेला हा भाग बागायत होण्यास मदत होणार आहे. या तिन्ही कामांसाठी अनुक्रमे २२५ कोटी, ९६५ कोटी आणि प्रकाशा बुराई या योजनेच्या सुप्रमासाठी ९७३ (पान ४ वर)



# विधान मंडळाच्या समितीने घेतला नंदुरबार नगरपालिकेचा आढावा

**नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी) - राज्य विधान मंडळाचा अंदाज समितीच्या शिष्टमंडळाने नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या आढावा घेत प्रकल्पांना भेटी देत पाहणी केली. यावेळी समितीचे अध्यक्ष आ.अर्जुन खोतकर यांनी शासन स्तरावरून प्राप्त झालेला निधी, पालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, विकासात्मक बाबी व प्रकल्पांविषयी माहिती घेतली.**

राज्य विधान मंडळाची अंदाज समिती सदस्यांच्या धुळे नंदुरबार जिल्ह्यात दौरा सुरू आहे. बुधवारी धुळे येथील दौरा आटपून गुरुवारी समितीचे शिष्टमंडळ सकाळी नंदुरबार दाखल झाले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीनंतर त्यांनी दुपारी पाच वाजता नगरपरिषदेला भेट दिली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ड.राम रघुवंशी, मुख्याधिकारी राजेंद्र वाघ यांनी सदस्यांच्या सत्कार केला. समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांच्यासह सदस्य आमदारांनी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष दालन,विषय समिती सभापती दालन त्याचप्रमाणे विविध विभागाच्या कार्यालयात जाऊन माहिती जाणून घेतली. यावेळी आमदार सदस्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधून कामकाजाची माहिती घेतली.

पालिकेच्या सभागृहात विविध विषयांच्या आढावा घेण्यात आला. आ.अर्जुन खोतकर यांनी शासन स्तरावरून प्राप्त झालेला निधी, पालिकेमार्फत (पान ४ वर)

## बस दरीत कोसळली आठ जखमी, एक ठार

नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- मोलगी ते अअक्कलकुवा रोडवरील मालीआंबा पाडा जवळ दरीत सार्वजनिक जागेवर २२ मे रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास गुजरात राज्याचे इको वाहन दरीत कोसळल्याने पिंपलाकंकाला ता डेडीयापाडा गुजरात येथील ४७ वर्षीय इसम ठार झाला असून गुजरात मधील आठ जण गंभीर जखमी झाले आहेत.गुजरात बसचे वाहन कंडक्टर गुमानसिंग सुरदास वसावा यांनी फिर्याद दिल्याने वाहन चालक महेंद्रभाई बामण्याभाई वसावे रा पानसर याच्या विरोधात अक्कलकुवा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेंद्र वसावा हा इको वाहन क्रमांक (पान ४ वर)

# जावयाकडून सासूला बेदम मारहाण सत्तावीस ग्रॅमची सोनपोत लांबविली

**सोनगीर दि.२३ (प्रतिनिधी) - कापडणे ता.धुळे येथे जावयाने सासूला मारहाण करुन, धमकी देऊन सासुची २७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत चोरुन नेल्याची फिर्याद सोनगीर पोलीसत दाखल झाली आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

उर्मिला सुनिल माळी (वय ४८, रा. कापडणे) यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये नमूद केल्यानुसार, उर्मिला माळी यांची मुलगी गायत्री आणि जावई तुषार भटुलाल माळी रा.धरणगांव जि.जळगाव यांच्यात काही दिवसांपासून वाद सुरू होता. त्यामुळे गायत्री १६ मे २०२५ पासून तिच्या माहेरी, कापडणे येथे आली होती. मुलीचा संसार सुखाचा व्हावा यासाठी उर्मिला व त्यांचे पती यांनी २० मे २०२५ रोजी धुळे येथील भरोसा सेलमध्ये अर्ज दाखल केला होता.२० मे २०२५ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास तुषार माळी आणि दिपक महाजन हे उर्मिला यांच्या घरी आले आणि गायत्रीला भरोसा सेलमध्ये तक्रार अर्ज दाखल केल्याबद्दल शिवीगाळ करू लागले. उर्मिला यांनी त्यांना शांतपणे बोलण्यास सांगितल्यावर तुषार आणि दिपक यांनी त्यांनाही शिवीगाळ आणि दमदाटी करण्यास (पान ४ वर)

## शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

धुळे, दि.२३- जेल रोड क्युमाईन क्लब समोर आय.एम.ए.हॉल येथे दि.२५ मे रोजी दुपारी ३ वाजता शिवसेना उबाठा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत उपनेते तथा संपर्क प्रमुख माजी आ.अशोक धात्रक, उपनेते डॉ.अद्वय हिरे, माजी आ.अनिल गोटे, उपनेत्या शुभांगी पाटील मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीसाठी शिवसेना-युवासेना, महिला आघाडी व सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी तसेच शिवसैनिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# आंब्याच्या आगमनामुळे धुळ्यात पपईला फक्त एक रूपया ६० पैसे

**धुळे, दि.२३ (प्रतिनिधी)- धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत आंब्याची आवक वाढल्याने पपईचे दर घसरले आहे. सध्या बाजार समितीत पपई विक्रीस येणाऱ्या शेतकऱ्यांना पपईसाठी केवळ एक रूपया साठ पैसे प्रतिकिलो दर मिळत आहे. त्यामुळे पपई उत्पादक शेतकरी तीव्र नाराज झाले आहेत. शासनाने फळ उत्पादनावर होणारा खर्च लक्षात घेता शेतक-यांना अपेक्षित दर कसा मिळेल, याची काळजी घेतली पाहिजे, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.**

धुळे तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकरी प्रयोगशील झाले आहेत. शेतक-यांनी पारंपारीक पिके घेतांनाच शेतीच्या काही भागात फळबागांची उभारणी केली आहे. अनेक शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षात पपई उत्पादनात आघाडी घेतली आहे. सध्या पपई काढणीला आली आहे. त्यामुळे (पान ४ वर)

# घरकुल पात्र लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास वाळू आ.राजेश पाडवी यांच्या हस्ते परवाने वितरण

**शहादा, दि.२३ (का.प्र.) - पंतप्रधान घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळूची रॉयल्टी पावती आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते देण्यात आली असून लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळणार असल्याने त्यांच्या बांधकामाचा खर्च कमी होऊन त्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.**

स्वतःच्या हक्काचे घर असावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशात पंतप्रधान आवास घरकुल योजनेची सुरुवात केली आहे. या अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना शासनातर्फे



बांधकामासाठी अनुदान दिले जात आहे.मात्र वाळूचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने बांधकामाचा खर्च परवडत नव्हता.सदर खर्च कमी व्हावा यासाठी लाभार्थ्यांनी आमदार राजेश पाडवी यांच्याकडे आपली कैफीयत मांडली. लाभार्थ्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत आमदार राजेश पाडवी यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याशी चर्चा करून शासनाने या लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली. (पान ४ वर)

## महिलेची गळफास घेवून आत्महत्या

धुळे, दि.२३- वाडीभोकर रोड कल्पना सोसायटीतील रहिवासी असलेल्या तीस वर्षीय विवाहितेने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. अमोल चौधरी दि.२२ मे रोजी सकाळी घराच्या हॉलमध्ये झोपेतुन उठल्यानंतर पत्नी भाग्यश्री हिला बेडरूममध्ये आवाज दिला असता कोणताही प्रतिसाद दिला नाही. बेडरूमचा दरवाजाही आतुन बंद असल्याने उघडता आले नाही. पश्चिम देवपूर पोलीसांना संपर्क साधण्यात आला. पोलीसांसह किरण चौधरी, श्याम गिते व जयेश वावदे यांच्या मदतीने बेडरूमचा दरवाजा तोडून आत पाहिले असता भाग्यश्री पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आली.

सेवा
सुपर स्पेशालिटी न्युरोट्रॉमा व क्रिटीकल केअर सेंटर
PATIENT SAFETY & QUALITY OF CARE
NABH (ENTRY LEVEL) PRE ACCREDITED

सुप्रसिद्ध तज्ञ डॉक्टरांकडून
मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबीर

आपणास कळविण्यात आनंद होतो कि सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर धुळे यांच्या तर्फे हाडांच्या आजार संबधित व हृदयरोग निदान, तपासणी व मार्गदर्शन शिबीर करण्यात आले आहे.

खालील लक्षणे आढळून आल्यास आवर्जून शिबिरात यावे.

▸ गुडघेदुखी व खुबा ( खांदा ) संबंधित आजारांवर उपचार
▸ दुर्बीणीद्वारे सांधा परिक्षण व सांध्याच्या आतील स्नायू व Ligament च्या वेगवेगळ्या आजारावरील उपचार ▸ कृत्रीम सांधेरोपण

डॉ. पियुष सुरेश वसईकर
MBBS, M.S. Orthopaedics (Pune),
FIJRS, FIASM
Arthroscopy And Sport Medicine Surgeon

▸ श्वास घेण्यास त्रास होणे
▸ हृदयाचे ठोके वाढणे
▸ छातीत धडधड होणे

डॉ. योगश पाटील
एमडी. डीएम ( कार्डिओलॉजी )
इंटरवेंशनल कार्डिओलॉजिस्ट

तपासणी आणि ECG मोफत ( फ्री ) २ डी इको या चाचणीसाठी 50% सूट
सोनोग्राफी अल्प दरात
आवश्यक चाचणी अल्पदरात

वार. रविवार दि. - २५/०५/२०२५ वेळ - ११ ते ३ पर्यंत.
ठिकाण - सेवा सुपर स्पेशालिटी व क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे ✆ 02562 - 246333, 247555

# प्रभाग क्र.सोळा मुलभूत सुविधांपासून वंचित स्वच्छता न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**धुळे, दि.२३- शहरातील प्रभाग क्र.१६ मधील नुतन पंचशिल कॉलनी परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सांडपाणी वाहुन जाण्यासाठी गटारी नसल्याने रस्त्यांवर दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेने**



**परिसराची तात्काळ स्वच्छता करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मनपा प्रशासनाला स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.**

प्रभाग क्र.१६ मधील दलित वस्तीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्यात आलेली नाही. स्वच्छतेसाठी मनपाचा कोणताही कर्मचारी येत नाही. फवारणी केली जात नाही. सफाई कर्मचाऱ्यांबाबत विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. वारंवार निवेदन देवूनही आता पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. परिसरात गटारींचे व स्वच्छतेचे (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -88,400 रु.+3% GST
सोने- 24 K -96,500 रु.+3% GST
चांदी- 01,2500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# सव्वीस मे रोजी नंदुरबारला तालुकास्तरीय लोकशाही दिन

नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुक्यातील अन्यायग्रस्त व अडचणीत असलेल्या महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी तालुका महिला व बालविकास विभागातर्फे दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार असून मे महिन्यातील तालुकास्तरीय लोकशाही दिन २६ मे रोजी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय नंदुरबार येथे आयोजित करण्यात आला असल्याचे सदस्य सचिव, तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन तथा बालविकास प्रकल्प अधिकारी विनोद वळवी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. महिला लोकशाही दिनात महिलांनी आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपले अर्ज घेवून तहसील कार्यालय, नंदुरबार येथे स्वतः उपस्थित राहावे. सदर महिलेची तक्रार वैयक्तिक असावी, न्याय प्रविष्ठ व आस्थापना विषयक, सामुहिक तक्रार या महिला लोकशाही दिनात स्विकारली जाणार नाही असेही वळवी यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

# आपला महाराष्ट्र

# विविध समित्यांचे उद्योग नित्याचे

विधान मंडळाच्या विविध समित्या असतात. त्यात अंदाज समिती, पंचायत राज समिती, लोक लेखा समिती, आश्वासन समिती,अशांचा समावेश आहे. या समित्यांची काही नित्याची कामे असतात, त्यास बिझिनेस असेही म्हटले जाते.त्या समितितील सदस्य किंवा पदाधिकारी यांच्या वर्तना विरूध्द काही लिहिले, प्रसारित केले मग भलेही ते सत्य असले तरी त्यांचा हक्कभंग होतो.म्हणून ते कसेही वागले तरी ते खपवून घ्यायचे आणि मुकाट्याने बसायचे. असा अलिखित नियम आहे. या समित्यांच्या दौऱ्यांचा जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी धसका घेतलेला असतो.समिती येणार म्हणून कोणीच काम करीत नाही.शासकीय यंत्रणेचा तसाही शिरस्ताच आहे की शंभर कामां पैकी एखादे काम करायचे. भेटून, चकरा मारून थकून जाऊन आपल्या कामाचा पिच्छा सोडून देणारांची असंख्य उदाहरणे आहेत. सामान्य माणसांची कोणतीच कामे ते करीत नाहीत. केलीच तर दलालांच्या माध्यमातून त्यांच्या पर्यंत गेलेली कामेच तेवढी ते करतात,त्यांचे रेट ठरलेले असतात.जसा विभाग असेल तसे रेट असतात. त्यांना मिळणारे वेतन अशाच प्रकारच्या कामांसाठी असते हे लपून राहिलेले नाही, या सिस्टिमलाच लोकशाही म्हणतात. मग लोकशाहीला ते मारक की तारक हे कसे ठरवावे ? नोकरशाही संवैधानिक अंमल बजावणी मंडळाचे दुसरे नाव आहे.तो लोकशाहीचा दुसरा स्तंभ आहे. हा स्तंभ सतत चरत असतो त्यामुळे त्याने संपूर्ण देशच पोखरून काढला आहे. तो कफल्लक आणि ते स्वत: समृध्द झाले आहेत. जास्त दूर जाण्याची गरज नाही.आपल्या जिल्ह्यातील निवृत्त, कार्यरत, दुसरीकडे स्थलांतरीत झालेल्या अधिकाऱ्यांच्या इस्टेटी बघितल्या, त्यांचा अभ्यास केला तरी ताबडतोब लक्षात येईल.मात्र त्यांची लाचलूचपत विभाग कधीच आपणहून चौकशी करीत नाही. ईडी सीबीआय आयकर विभाग त्यांच्यासाठी नाही. त्यामुळे सदैव ते चरतच असतात. राजकीय विरोधकांना नामोहरम करण्यासाठी या संस्थांचा उपयोग केला जातो ही बाब उघड आहे. दुसरा लोकशाहीचा जो स्तंभ आहे त्याचे नाव कायदे मंडळ .या मंडळात असलेले लोकप्रतिनिधी यांचा मोठा दरारा असतो.त्यातल्या त्यात ते सत्तारूढ असले तर बोलायलाच नको. अशा लोक प्रतिनिधींच्या ह्या शासकीय समित्या असतात.त्यांचा थाटच और असतो.सगळी सरकारी यंत्रणा त्यांच्या दिमतीला असते.आपल्याकडे ते पाहुणे म्हणून आलेले असल्याने पाहुण्यांची सरबराई करणे हे आपले कर्तव्यच असते.तो आपला धर्म आहे. अतिथी देवो भव असे उगाचच म्हटलेले नाही. त्यानुसार आपल्याकडे आलेल्या अतिथींची सेवा केली जाते.पण सेवेची चर्चा कर्मचारी जगतात किमान महिनाभर तरी चालते. याचा अर्थ ती सरबराई किती आणि कशी असते त्या संबंधीची कल्पना सहज करता येऊ शकेल. धुळे जिल्ह्यात आलेली समिती काही पहिली आणि शेवटची नव्हती.या पूर्वी दरवर्षीच येणाऱ्या समित्यांचे अनेक किस्से आहेत. त्यांना भरभरून दिलेल्या बॅंगांची वर्णने देखील तेवढीच आहेत. जसा समितीचा आणि समिती प्रमुखाचा दर्जा आणि दरारा असेल यावर बॅगांचा आकार ठरतो. ते उद्योग सिध्द होत नाहीत. धुळे विश्राम गृहात सापडलेले एक कोटी चौऱ्यांशी लाखांचे घबाड देखील कोणाचे ते सिध्द झालेले नाही. त्या पैशांशी आमचा काही संबंध नाही असा खुलासा अंदाज समितिच्या प्रमुखांनी नंदनगरीत केला.ज्या सूटमध्ये रकम सापडली तो सूट आपल्या स्वीय सहाय्यकाच्या नावाने बुक केलेला नव्हता असेही त्यांनी सांगून टाकले आणि या प्रकरणी हात झटकले. माजी आमदार अनिल अण्णा गोटे यांना मात्र खबर पक्की मिळाली होती. कोणी दिली कशी दिली त्यांचा खुलासा त्यांची ईच्छा असेल तर ते करतील. ते विश्राम गृहात पोहचण्या आधीच कुठल्या वाहनातून किती रक्कम लंपास झाली त्याबद्दलची माहिती देखील ते मिळवतील अथवा मिळविली असेल. त्या निमित्ताने एवढे तर निश्चितच सिध्द झाले की काही तरी गडबड आहे.कालांतराने त्याबद्दलचे वास्तव बाहेर येईल किंवा येणारही नाही. शेवटी ती बाब माहितीच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे.

या प्रकरणाची खबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पर्यंत ताबडतोब पोहचली. त्यांनी दखलही ताबडतोब घेतली आणि चौकशी समितीची घोषणा केली. विधानसभा आणि विधान परिषदेच्या अध्यक्षांना सांगून त्यांनी नीतिमूल्य समिती गठित करून या प्रकरणाची चौकशी करावी असेही सांगितल्याची बातमी आहे.या चौकशांमधून नेमके काय बाहेर येईल की काहीच येणार नाही या प्रश्नांची उत्तरे काळाच्या पोटात दडलेली आहेत. तुर्तास लोकांना या घोषणेमुळे हायसे वाटेल.आपल्या कार्यतत्पर मुख्यमंत्र्यांनी आपल्याच सहकारी मित्रांची चौकशी तातडीने लावली असा संदेश ही या घोषणेतून जनते पर्यंत जाईल.शेवटी राजकीय अस्तित्व आणि कथित पारदर्शकते साठी अशा घोषणा कराव्या लागतात.धुळ्यात घबाड सापडले म्हणून आणि अनिल अण्णा गोटे यांची कार्य पध्दती मुख्यमंत्र्यांना माहीत असल्यामुळे चौकशीची घोषणा त्यांनी केली. ही बाब मान्यच केली पाहिजे. पण प्रश्न अनुत्तरीतच राहतो. धुळ्यात घडले म्हणून चर्चा झाली.इतर ठिकाणी तेरी चूप मेरी भी चूप अशीच परिस्थिती आहे. त्याची चौकशी कशी होणार ? म्हणजेच आम्ही मारल्या सारखे करतो तुम्ही रडल्या सारखे करा अशीच ही भानगड आहे. ठिकठिकाणच्या यंत्रणा सातत्याने कलेक्शन चे सत्कार्य करीत आलेल्या आहेत.त्या कोठून आणतात किती आणतात त्यांची खबरबात कुणालाच नसते. काही प्रसिद्धी माध्यमातील कर्मी मागावर असतात. ते बित्तंबातमी काढत असतात पण त्याची फक्त चर्चाच तेवढी करू शकतात.लिहू किंवा छापू शकत नाहीत. कुठल्यातरी चॅनेलवर दाखवू शकत नाहीत कारण त्यांच्या कडे कुठलाच भक्कम पुरावा नसतो. संबंधीत लोक तो मागे ठेवत नाहीत. एखादा फुटीर निघाला तर त्याची नौकरी धोक्यात येईल म्हणून तोही खिशात हात घालून मख्खपणे उभा असतो.

प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा विशिष्ट लोक भेट देण्यासाठी येत असल्यास कामाला लागतात ही बाब लपून राहिलेली नाही.त्याबद्दलची रसाळ वर्णने ऐकायला मिळतात आणि मनोरंजन होते. ते ईतके भितात यांचा अर्थ त्यांचे हात बरबटलेले असतात. या सर्व विभागांत प्रथम क्रमांक कोणाचा हे एक कोडेच आहे. कारण एकाची ईमारत बघावी तर दुसऱ्या विभागातील भिडूची त्यापेक्षा उंच असते विस्तृत असते. आलिशान असते. काही ठिकाणी तर असे चित्र आहे की, शिक्षणाधिकाऱ्याचा बंगला बांधकाम खात्यात कधीकाळी कार्यकारी अभियंता असलेल्या अधिकाऱ्या पेक्षाही आलिशान असतो.आरटीओची तर कल्पनाही करवत नाही. फक्त बातमी आली की आरटीओचे नाके बंद होणार आहेत तेवढ्याने भल्या भल्यांची शुगर आणि ब्लडप्रेशर वाढलेले आहे. म्हणजे किती कमाई असू शकते याबद्दलचा अंदाज जाणकार बांधू शकतील.शेतात किंवा बिगारी काम करून पोटभरणारास हे जग कळण्याची सुतराम शक्यता नाही.तशीच ती नगरा नगरात फिरून दिवसभर धुणी भांडी करणाऱ्या माय बहिणींच्याही गावी नाही. व्यापारी बांधव व्यवसाय करतात भांडवलाची गुंतवणूक करतात कधी नफा तर कधी नुकसान सोसतात.त्याच प्रमाणे छोटे व्यावसायिक असतील किंवा कष्ट करणारा कोणताही घटक असेल तो कष्ट करून निर्वाह चालवतो हे सर्व घटक कर देतात आणि त्यांच्या पैशांवर मुठभर लोक डल्ला मारतात.ही आमची लोकशाही आहे.मग कुठली चौकशी करताय ?

# बेटावद-मुडावद रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था

**धुळे, दि.२३- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद ते मुडावद या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. मुडावद येथील तापीच्या संगमावर असलेल्या कपिलेश्वर मंदिरात दर्शनासाठी अनेक भाविक जातात. सध्या या रस्त्यावर ठिकठिकाणी लहान-मोठे आकाराचे खड्डे पडले आहेत. त्यामुळे भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हाचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या मतदार संघात हा रस्ता आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुरूस्तीबाबत मंत्री रावल यांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा भाविकांची आहे.**

शिंदखेडा तालुक्यातील तापी काठावर असलेल्या मुडावद येथे तापी आणि पांझरा नदीचा संगम आहे. या संगमावर प्राचीन कपिलेश्वर मंदिर आहे. त्यामुळे दर्शनासाठी तसेच मनोकामना पुर्ण झाली म्हणुन नवस फेडण्यासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. यापुर्वी जयकुमार रावल मंत्रीमंडळात असतांना या रस्त्याची बांधणी झाली. परंतु गेल्या काही वर्षात देखभालीकडे झालेले दुर्लक्ष आणि भाविकांची वाढलेली संख्या लक्षात घेता या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी लहान-मोठया आकाराचे खड्डे पडले आहेत. शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथुन अनेक भाविक मुडावद पर्यंत पोहचतात. या रस्त्याची दुरावस्थ झाल्याने बैलगाडी आणि रिक्षांना प्रवास करणे कठीण झाले आहे. जिल्हाचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या क्षेत्रात या रस्त्याचा समावेश आहे. त्यामुळे मंत्री रावल यांनी भाविकांची सोय व्हावी म्हणुन रस्ता दुरूस्तीकडे लक्ष दयावे, अशी अपेक्षा नागरीकांची आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**मुंबई, दि.२३- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती राज्यभर विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या निमित्ताने नाशिक, पुणे आणि नागपूर येथे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या त्रिशताब्दी सोहळ्यामध्ये महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि इतिहास यांचा गौरव करण्यासाठी उत्तम संधी आहे, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने आयोजित करण्यात येत असलेल्या हा कार्यक्रम मंत्री ॲड. शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.



नागपूरमध्ये २५ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित पोवा-डे, संगीत, नाट्य आणि इतर कलाविष्कार सादर केले जाणार आहेत. नाशिक येथे २७ आणि २८ मे रोजी गाथा अहिल्यादेवींची, आपल्या संस्कृतीची या नावाने दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सव आणि नाट्य प्रयोग आयोजित करण्यात आला आहे. तसेच २८ मे रोजी राजयोगिनी अहिल्यादेवी या ऐतिहासिक नाटकाचे सादरीकरण होणार आहे. या दोन्ही दिवसांचे कार्यक्रम सायंकाळी ६.३० वाजता सुरू होतील.

पुणे येथील कार्यक्रम ३१ मे रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी वाजता होणार आहे. येथे शाहिरी पोवाडा, मर्दानी खेळ, भारूड, वासुदेव आणि पुण्यश्लोक महानाट्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजलेला हा सोहळा रसिकांच्या मनात ठसा उमटवणार आहे. तीनही जिल्ह्यात होणारे हे सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी उपस्थित राहून याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना बीजेएसच्यावतीने मोफत शिक्षण; संपर्क साधण्याचे संस्थेचे आवाहन

**शिंदखेडा, दि.२३- भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांच्यावतीने यंदाही महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रवेश देऊन १२ वी पर्यंतचे शिक्षण वाघोली (पुणे) येथे मोफत दिले जाणार आहे. तसेच भोजन, निवास, वैद्यकीय इत्यादी सुविधा शिक्षण पूर्ण होण्यापर्यंत मोफत देण्यात येतील. यासाठी इयत्ता ५ वी व ६ वी मध्ये १०० मुला मुलींना प्रवेश देण्यात येणार असून ७ जून पर्यंत अर्ज वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प पुणे-नगर रोड, बकुरी फाटा पुणे येथे सादर करण्यात यावे.**

संस्थापक शांतीलालजी मुथा हे गेली ४० वर्षे अशा प्रकारचे सामाजिक कार्य करीत आहेत. लातूर भूकंपातून १२०० मुलांना पुणे येथे आणून त्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी या कार्याची सुरुवात केली होती. १९९७ सालापासून मेळघाट परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना पुणे येथे शिक्षणासाठी आणून त्यांना शिक्षणाबरोबर सक्षम नागरिक बनवण्यामध्ये बीजेसने यश मिळवले आहे. आतापर्यंत ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची शैक्षणिक पुनर्वसन केले असून, या विद्यार्थ्यांच्या त्यांच्या भावी पिढीचे चेंज एजंट बनविण्यामध्ये बीजेएसला यश प्राप्त झाले आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला मुलींना ही सुविधा प्राप्त करण्यासाठी बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, राज्यध्यक्ष केतन शहा, राज्य सचिव प्रविण पारख, मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन यांच्यासह संपूर्ण बीजेएसच्या वतीने देण्यात येणाऱ्या मोफत शिक्षण तसेच भोजन निवास सुविधेच्या संबंधितांनी लाभ घ्यावा असे आवाहन बीजीएसचे खानदेश विभाग अध्यक्ष प्रा.चद्रकांत डागा यांनी केली आहे.

**प्रवेशासाठी साधा संपर्क**

बीजेएसचे प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंखे (९४२३०७४ २३४), वसतीगृह व्यस्थापक साईनाथ रापतराव (९९७०००१०११), प्रमुख अधीक्षक रामदास ओटे (९४२०७८६२१२) आणि सविता सुतार (९८६०१०५३२६) यांच्याशी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या मोफत शिक्षण सुविधेबाबत संपर्क साधावा, असे आवाहन प्रा.डागा यांनी केले आहे.

# सैन्याचे मनोबल उंचावण्यासाठी शिंदखेड्यात तिरंगा प्रतिकृती रॅली

**धुळे, दि.२३- ऑपरेशन सिंदूर राबवुन भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय जवानांनी केलेल्या कार्याचा सर्व भारतीयांना अभिमान आहे, असे म्हणत शिंदखेडयात ५११ फुट लांबीच्या तिरंगा ध्वजाची प्रतिकृती मिरविण्यात आली. या रॅलीत शिंदखेडयातील नागरीकांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला. सावता महाराज चौकापासुन निघालेल्या रॅलीचा समारोप महात्मा गांधी चौकातील महादेव मंदिराजवळ झाला.**

काश्मीर मधील पहलगाम येथे २२ एप्रिलला पर्यटकांवर बेछुट गोळीबार झाला. त्यात २६ भारतीय ठार झाले. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ९ ठिकाणे उद्धवस्त केले. भारतीय सैन्याच्या या कामगिरीबाबत सर्व भारतीयांना अभिमान वाटतो. जवानांना प्रोत्साहन देण्यासाठी ठिकठिकाणी राष्ट्रध्वजाच्या भव्यदिव्य प्रतिकृतींची रॅली काढण्यात येत आहे. त्याला शिंदखेडा अपवाद ठरले नाही. शिंदखेडयात ५११ फुट लांबीच्या तिरंगा ध्वजाच्या प्रतिकृतीची मिरविणुक काढण्यात आली. शिंदखेडयातील सावता महाराज चौकात असलेल्या हनुमान मंदिरापासुन रॅलीला सुरूवात झाली. माळीवाडा, भगवा चौफुली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी चौक या मार्गाने निघालेल्या रॅलीचा समारोप महादेव मंदिराजवळ झाला. या रॅलीत शाळकरी मुली भारतमातेची वेशभूषा धारण करून सामील झाल्या होत्या. माजी सैनिक आणि इतर नागरीक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

अग्रस्थानी शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख अनिल जगताप, धुळे महानगर प्रमुख संजय वाल्हे, वैद्यकीय कक्षाचे शेखर बडगुजर, संजय कुसळकर, उपमहानगर प्रमुख अजय पाटील, रतका गुरव, वंदना मराठे, वच्छला माळी, शोभा माळी, लता पाटील, प्रमिला पाटील, कमल जाधव, निंबा बेडसे, हिम्मत सोनवणे, नाना मोहिते, नथू साळुंखे, विठ्ठल नेरे, मनोहर ठाकरे, सावकार आहिरे, खेमराज पवार, भालेराव पवार, राजेंद्र पवार, प्रकाश पाटील, रामदास खैरनार उपस्थित होते.

# पोक्सो कायद्यान्वये आरोपीस जिल्हा सत्र न्यायालयाने ठोठावली वीस वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा, दंड

**नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी)- पंधरा वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस पोक्सो कायद्यान्वये जिल्हा सत्र न्यायालयाने वीस वर्षाची सश्रम कारावास व दहा हजाराचा दंड अशी शिक्षा ठोठावली.**

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ॲपेरिक्षा चालक गुडडया मका भिल (चित्ते) याने पिडीत बालिकेस ती बकऱ्या चारत असतांना संधी साधून तिला जबरदस्तीने ॲपेरिक्षात बसवून तिला प्रकाशा पुलाकडील एका झोपडीत नेवून लैंगिक अत्याचार केला. यावरुन नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात आरोपी ॲपेरिक्षा चालक गुडडया मका भिल (चित्ते) याचे विरुध्द गुन्हा नोंदविला होता. आरोपीस तात्काळ पोलीसांकडून अटक करण्यात आली होती. नंदुरबार तालुका पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांच्यासह त्यांच्या सहकारी पोलीस अंमलदाराने सदर गुन्ह्याचा सखोल तपास करीत महत्वाचे पुरावे सादर केले होते, तसेच गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी याचे विरुध्द मुदतीत दोषारोपपत्र प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात सादर केले होते.

सदर खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश के.आर. पेठकर यांच्या समोर झाली. सदर खटल्यामध्ये सरकार पक्षाच्यावतीने साक्षीदार तपासण्यात आले. त्यात पिडीत बालिका, पिडीत बालिकेचे पालक, वैद्यकीय अधिकारी, पंच व तपास अधिकारी यांच्या साक्ष महत्वाच्या ठरल्या आहेत, आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाल्याने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश के. आर. पेठकर यांनी आरोपीस भा.द.वि. क.. ने.क.-३७६ (२) (एन), ५०६ व बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ६ प्रमाणे दोषी ठरवत वीस वर्ष (२० वर्ष) सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर खटल्याचे कामकाज सरकारी पक्षाचे वतीने अति. सरकारी अभियोक्ता ॲड.व्ही.सी. चव्हाण यांनी कामकाज पाहिले होते. तसेच पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सागर नांद्रे, कोर्ट पैरवी अंमलदार पोहेकॉ नितीन साबळे, पोहेको पंकज बिरारे आणि पोहेकॉ शैलेंद्र जाधव यांनी कामकाज पाहीले आहे. तपास अधिकारी व त्यांचे पथक तसेच अति. सरकारी अभियोक्ता यांचे नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, नंदुरबार संजय महाजन यांनी विशेष अभिनंदन केले.

## विजेच्या धक्क्याने मृत्यू

धुळे- लग्नाचा मंडप बांधत असतांना विजेचा धक्का लागल्याने पंचवीस वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.बल्हाणे पोस्ट पाडळदे गावातील गणेश आनंदा पाटील (वय २५) हा इसम स्वामीनारायण मंदिर येथे लग्नाचा मंडप बांधण्याचे काम करत असतांना विजेचा धक्का लागल्याने गंभीर जखमी झाला. डॉ.प्रफुल्ल पवार यांनी तपासून मयत घोषित केले.














## शब्दकोडे क्रमांक : २१६५



आडवे शब्द : १. भिक्षु ४. जाड नसलेला ७. देवाची अवकृपा ९. वातावरणातील उष्णता १२. एक जंगली पशू १४. सरिता १६. मरण देवता १७. अन्न पदार्थ तिखट बनवण्यासाठी त्यात वापरतात १८. नायिका १९. लहान २२. दूध आटवून तयार केलेला एक पदार्थ २३. मोकळीक २४. संगीतातील एक राग २६. घुंगरू २७. मनावरील ताण २९. मग्न ३१. कसेही वाकणारे ३३.हिंदीतील-जान ३४. घास ३७. शत्रूचे विमान ओळखण्यासाठी वापरतात यंत्रप्रणाली ३९.फणसाचा एक प्रकार ४१.मोठ्या भावास आपण आदराने हाक मारतो ४२.पलीकडे ४३.सेवकांचा गोतावळा ४४.प्रियकर ४६.च्या विषयाशी संलग्न ४८.नवीन ४९.नोकरीची केलेली बदली-हिंदीत ५२.हिंदीत-जवळ ५३.नुतन ५४.साल ५५.तांबडा

उभे शब्द : १.पुत्र २.प्रभुरामचंद्रांची पत्नी ३.आईचा भाऊ ५.पदधत ६.काम ८.डाव १०.नवरा ११.डोळे १३.एक मोठ्या आकाराचा पक्षी १५.दुबळा १९.छाया २०.न्यायालय २१.ताकद २२.तरबेज २५.स्त्बर २६.चक्र २८.अश्विनी भावे, आशुतोष गोवारीकर यांचा एक सिनेमा ३०.शहर ३२.सरणावर रचलेली लाकडे ३५.वकीली ३६.नाशिक शहरातून वाहणारी एक नदी ३८.चेटकीण-हिंदीत३९.विनाश ४०.भाकरी बनवण्यासाठी वापरण्यात येणारे धान्य ४४.घर ४५.विचार ४८.भालचंद्र नेमाडे यांनी लिहीलेली एक कादंबरी ५०. खबर ५१. स्त्बच्छ

### शब्दकोडे क्रमांक : २१६४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | वा | ज | | क | | पो | त | | मी | | गा |
| ठ | | ब | द | मा | श | | र | जा | | स | भा |
| व | स्त | रा | | ल | | घा | | दू | प | ट्टा | |
| ण | | ट | न | | भा | व | ना | | ल | | न |
| | वि | | भ | रा | री | | रा | ठ | | च | व |
| प | ना | ह | | डा | | ची | ज | | फु | ल | |
| | य | | ती | | ज्ञा | न | | पं | गा | | क |
| का | क | वी | | सु | त | | सं | त | | ना | डी |
| र | | ट | पो | रा | | म | ग | | खा | द | |
| खा | दी | | ल | ग | न | | र | ब | र | | आ |
| ना | | का | का | | म | न | | ल | | पा | व |
| | सा | ठ | | जा | न | | स | क | ल | | क |

## पान १ वरुन

### शिंदे म्हणतात पी.ए. निलंबीत

खोलीतील कपाटाची पाहणी केल्यानंतर त्यात १ कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रूपये आढळले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष चौकशी समिती गठीत करून चौकशी होईल, असे जाहीर केले. तर विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी खोतकर यांचे स्विय सहायक यांना निलंबीत केल्याचे २२ मेस स्पष्ट केले. या पार्श्वभुमीवर दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी समितीने तीन गावांची पाहणी करून पुन्हा आढावा बैठक घेतली. त्यावेळी प्रसार माध्यमांशी बोलतांना समिती अध्यक्ष खोतकर यांनी सांगितले की, धुळे नंदुरबार जिल्हयाचा दौरा करतांना कमी कालावधीत चांगले विषय हाताळण्यात आले. या भागातील आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभागाच्या योजनांची संवेदनशीलपणे अंमलबजावणी करावी, अशा सुचना आम्ही केल्या असल्याचे खोतकर यांनी सांगितले.

शासकीय विश्रामगृहाच्या खोलीत सापडलेले पैसे आणि दोष-रोप याबाबत विचारले असता समिती अध्यक्ष अर्जुन खोतकर म्हणाले, शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या रकमेशी समितीचा काहिही संबंध नाही. समिती सदस्य या विश्रामगृहावर गेलेच नाही. तसेच संशयित खोलीमध्ये माझे स्विय सहायक किशोर पाटील राहत नव्हते. याबाबतची खात्री करण्यासाठी विश्रामगृहावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासुन पहावे. विश्रामगृहात जे काही घडले त्याला समिती आणि समितीचा एकही सदस्य जबाबदार नाही. मुख्यमंत्रींनी उच्चस्तरीय समिती गठीत करून चौकशी करण्याचे जाहीर केले आहे. समितीवर स्थानिक पातळीवरून आणि शिवसेना नेते संजय राऊत यांच्याकडून होणारे आरोप तथ्यहीन आहेत. समितीवर आरोप झाले तरी समिती निरनिराळ्या गावात जावुन कामांची पाहणी करीत जनतेशी चर्चा केली. आदिवासी क्षेत्रात पावसळयापुर्वी रस्त्यांची कामे झाले पाहिजे, अशा सुचना आम्ही केल्या असल्याचे अर्जुन खोतकर यांनी सांगितले.

### ८४ च्या फेऱ्यात अनेक अडकणार

विभागातील अधिकारी-कर्मचारी आणि गुलमोहर विश्राम गृहावरील काही कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या घटनेत कोणा-कोणाचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष संबंध येतो, हे तपासले जाणार आहे. तपास यंत्रणेने गुलमोहर या शासकीय विश्रामगृहावरील सर्व सहा सीसीटीव्ही कॅमेरे आणि त्यातील चित्रीकरण तपास यंत्रणेने ताब्यात घेतले आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरण पाहून त्याचे सक्षी-क्षण करीत अन्वयार्थ काढून तपास पुढे नेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय गुलमोहर या शासकीय विश्रामगृहावर येणाऱ्या आणि जाणाऱ्या व्यक्तींची नोंद होत असलेली नोंदणी पुस्तके देखील तपासासाठी ताब्यात घेण्यात आली आहेत. यातून १५ मे पा-सून घटना घडलेल्या दिवसापर्यंत शासकीय विश्रामगृहाच्या आवारात कोणकोण आले. त्याचे येण्यामागचे प्रयोजन काय, याचाही तपास यात होण्याची शक्यता आहे.

### रविवारी मान्सून केरळात दाखल होणार

आता तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे. पंधरा जूनपर्यंत देशातील बहुतांश भागात मान्सूनने व्यापण्याची शक्यता आहे. दरम्यान यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. यंदा भारतामध्ये सरासरी १०७ टक्के पाऊस पडू शकतो असा अंदाज आहे. हवामान खात्यानं वर्तवलेल्या पावसाच्या अंदाजानंतर शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला असून पेरणीपूर्व मशागतींना अनेक भागांमध्ये वेग आला आहे.

### सुरळीत विजेसाठी युद्धपातळीवर सज्जता

वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना एसएमएसद्वारे, व्हॉटस् ॲप ग्रुप्स, ट्विटर व सोशल मिडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळविण्यात यावे. खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरूस्ती कामांना वेग द्यावा. तसेच महावितरणच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये असे स्पष्ट निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

### बुराई योजना लवकरच पूर्णत्वास येणार

कोटींच्या निधीची आवश्यकता आहे. २२ मे २०२५ रोजी जलशक्ती मंत्रालयाने खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी केलेल्या निधीच्या मागणीवर केंद्रीय जलशक्ती मंत्री ना. सी.आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या महत्वपूर्ण बैठकीत वरील सर्व योजना पूर्णत्वास येण्यासाठी व भरघोस निधी देण्यासाठी हिरवा कंदील दिला आहे. लवकरच हे सर्व प्रकल्प पूर्ण होवून १००% कार्यान्वित होणार असल्याची माहिती धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी दिली आहे.

### बस दरीत कोसळली

जीजे २२/४१५८ या वाहनाने घरी परत जात असतांना वाहन चालकाचा तोल गेला. त्यानंतर वाहन गुजरात राज्याचे इको वाहन दरीत कोसळले. यात वाहन चालक महेंद्र वसावा, त्याची पत्नी संतीताबेन वसावा, सुभाष वसावा, मंजूलाबेन वसावा, नरपत वस-ावा, भरत वसावा, शांतीबेन वसावो ,ताराबेन वसावा हे आठ जण जखमी झाले आहेत. तर जीवनदास वसावा ४७ रा पिंपलाकंकाला हा ठार झाला. पोनि गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि भाऊसाहेब भगत यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.

### जावयाकडून सासूला बेदम मारहाण

सुरुवात केली. यादरम्यान उर्मिला यांचा पुतण्या महेश माळी यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयतक केला, परंतु तुषार आणि दिपक यांनी त्यालाही शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली. दोघांनी उर्मिला आणि महेश यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि निघून गेले. थोडा वेळानंतर, उर्मिला यांनी टेबलावर ठेवलेली त्यांची सुमारे १ लाख रुपये किमतीची २७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत पाहिली असता ती गायब होती. त्यांनी घरात शोध घेतला, परंतु ती सापडली नाही. त्यामुळे त्यांना खात्री झाली की, त्यांचे जावई तुषार माळी आणि त्याचे पाहुणे दिपक महाजन रा. उदना, (सुरत) यांनीच ती चोरली आहे.उर्मिला माळी यांनी सोनगीर पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी तक्रार दाखल केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रवींद्र बागुल हे करीत आहेत.

### पपईला फक्त एक रूपया ६० पैसे

बाजार समितीत पपई विक्रीसाठी येणा-या शेतक-यांची संख्या वाढली आहे. अशा परिस्थितीत निरनिराळ्या प्रकारच्या आंब्यांची देखील आवक वाढली आहे. साहजिकच अनेक नागरीक आंबे खरेदीकडे वळले आहेत. पपई दुर्लक्षित झाल्यामुळे शेतक-यांना दर मिळणे कठीण झाले आहे. सध्या बाजार समितीत पपईला शेतक-यांसाठी १ रूपये ६० पैसे प्रतिकिलो या दराने पैसे दिले जात आ-हेत. त्यामुळे शेतक-यांना मनस्ताप होत आहे. वादळी वा-यातुन सांभाळलेल्या पपईला इतका तुटपुंजा दर मिळत असेल तर उत्पादन खर्चाच्या कितीतरी कमी पैसे शेतक-यांना मिळत आहेत. या दरामुळे शेतकरी कर्जबाजारी होईल आणि शेतक-यांच्या मनात आत्महत्येचा विचार येईल. फळबाग उत्पादनावर होणारा खर्च लक्षात घेता फळांना योग्य दर मिळावा, अशी अपेक्षा फळबागधारक शेतक-यांची आहे.

### मुलभूत सुविधांपासून वंचित

काम तात्काळ करावे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रभाग क्र.१६ मधील शुभम वानखेडे, मंगला माहिते, सुनंदा पवार, रेखा कोडगीर, मंगला जगताप, सुधा वाघ, प्रमिला वाघ, आरती बैसाणे, चित्रा सोनवणे, रंजना ठाकुर, शालिनी पाटील, मनोज वाघ, प्रकाश वेंदे, ए.व्ही.बेडसे यांनी दिला आहे.

## पान १ वरुन

### वेडा माणूसच विश्वास ठेऊ शकतो

येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे. पण, यापुर्वी काही प्रकरणांमध्ये एसआयटी कडून चौकशा झाल्या आहेत. त्यातून काही झाले, हे सर्वश्रृत आहे. त्यामुळे धुळ्यातील बेकायदेशीर रक्कमेच्या चौकशीत संशयितांना संरक्षित केले जाईल, असे अप्रत्यक्ष म्हणत अनिल गोटे यांनी थेट मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले आहे.

**भ्रष्टाचारास शासन मान्यता, संरक्षण - गोटे**

धुळ्यात शासकीय विश्रामगृहावर साडेपाच कोटी रूपये आहेत त्याची दखल घ्या, असे मी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर आणि जिल्हा पोलिस प्रमुख श्रीकांत धिवरे यांना सांगितले, असे नमूद करून गोटे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, फोन केल्यानंतर ढिवरे यांनी दहा मिनिटात येतो, असे सांगितले. पण, दुसऱ्या दिवशी दुपारी एक पर्यंत ढिवरे आले नाहीत. रात्री साडेअकराच्या सुमारास अतिरिक्त जिल्हा पोलिस प्रमुख किशोर काळे आणि काही अधिकारी विश्रामगृहावर आले. घटनेचे गांभीर्य मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उशीरा लक्षात आले. तेव्हा त्यांनी माध्यमांसमोर येत, सरकारने ही घटना गांभीर्याने घेतली आहे. विधानसभेच्या अस्मितेचा प्रश्न आहे, असे सांगत चेहऱ्यावर गांभीर्याचा आव आणला आणि एसआयटी चौकशी करेल, असे जाहीर केले. आजवर एसआयटीच्या चौकशीतून काय निष्पन्न झाले आहे, हे साऱ्यांना ठाऊक आहे. राजकीय जीवनात मी वसंतराव नाईक यांच्यापासून एकनाथ शिंदे यांच्या पर्यंतचे अनेक मुख्यमंत्री पाहिले आहेत. मी आमदार असताना पंचायत राज समितीचा सदस्य होतो. त्यावेळी अशीच रक्कम गोळा केली जात होती. धुळे जिल्हा परिषदेचे तत्कालीन उपमुख्यकार्यकारी अधिकाऱ्यास पाच लाख देताना मी संबधीतास पकडून दिले होते. त्यानंतर मला पंचायत राज समितीमधून काढून टाकण्यात आले. हे सारे पाहिल्यानंतर माझी अशी खात्री झाली आहे की, भ्रष्टाचारास शासनाची मान्यता आहे. भ्रष्टाचारास शासनाचे संरक्षण आहे, असेही माजी आमदार गोटे यांनी प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे.

### घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना..

आमदारांच्या या निवेदनाची दखल घेत राज्य शासनाने घरकुल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचे घोषणा केली. तालुक्यातील मलोणी येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते शहादा तालुक्यातील घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मोफत वाळू योजनेअंतर्गत प्रत्येकी पाच ब्रास वाळू रॉयल्टीची पावती देण्यात आली. याप्रसंगी तहसीलदार दीपक गिरासे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा. मकरंद पाटील,शहराध्यक्ष ज्ञा-नेश्वर चौधरी, लोणखेडा मंडळ अध्यक्ष नितीन पाटील,विनोद जैन,भाईदास पाटील,भरत पाटील, प्रशांत पाटील पदाधिकारी उपस्थित होते.

### नंदुरबार नगरपालिकेचा आढावा

राबविण्यात येणाऱ्या योजना, विकासात्मक बाबी व प्रकल्पांविषयी मुख्याधिकारी राजेंद्र वाघ यांच्याकडून माहिती जाणून घेतली. प्रसंगी आ.किशोर वाघ, जिल्हाधिकारी मिताली सेठी,आ. काशीराम पावरा, आ.कैलास पाटील, आ.सदाशिव खोत, आ.राजेश राठोड, विधिमंडळाचे सचिव (समिती) दामोदर गायकर, जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे,माजी सभापती कैलास पाटील,माजी नगरसेवक रवींद्र पवार उपस्थित होते. नगरपालिकेच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पांविषयी तसेच पालिकेच्या नूतन प्रशस्त वास्तूची प्रशंसा करीत समिती अध्यक्ष आ.अर्जुन खोतकर यांनी समाधान व्यक्त केले.

## निधन वार्ता

### रावसाहेब देसले



धुळे, दि.२३- देवपूर नकाणे रोड प्रमोद सेक्टर ३ मधील रहिवासी रावसाहेब पितांबर देसले (वय ४२) यांचे आज रात्री ८.५० वा.अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी ११ वा.राहते घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

### गंगाधर विसपुते



शहादा, दि.२३- गुजरात राज्यातील बडोदा येथील रहिवासी गंगाधर ऊखर्डु विसपुते (७७) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते बडोदरा अहिर सुवर्णकार समाजाचे माजी कार्यकारिणी सदस्य व उत्कृष्ट तबला वादक, भजनकार होते. त्यांचे पश्चात मुले, सून, दोन मुली, जावई, नात सूना, नातवंडे असा परिवार असून शहादा तालुका देखरेख संघाचे माजी व्यवस्थापक गजानन विसपुते यांचे साडूभाऊ होत.

### अवधान टोलनाका परिसरात मारामारी

धुळे, दि.२३- अवधान टोलनाका मारामारी प्रकरणी व्हायरल झालेल्या व्हीडीओ संदर्भात मोहाडी पोलिसांकडे चौकशी केली असता दुपारी बारा वाजेच्या सुमारास गोलू पाटील व मिलींद बैसाणे यांच्यामध्ये किरकोळ कारणावरुन हाणामारी झाली. याबाबत मोहाडी पोलिसांनी दोघांना समज देवून सोडून दिल्याचे सांगितले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

# बेकायदेशीर अवजड वाहनांवर कारवाई करा
# नंदुरबारला महाराष्ट्र वाहतूक सेनेची मागणी

**नंदुरबार, दि.२३ (प्रतिनिधी) - नंदुरबार शहरातून अवजड वाहनांची वर्दळ ही दिवसेंदिवस वाढत असून यात नाशिक, मुंबई, संभाजीनगरसह इतरत्र जाणारे अवजड वाहन चालक हे नशेच्या भरात बेदरकारपणे वाहने चालवुन नागरिकांच्या जिवाशी खेळ करीत आहेत. सदर मद्यधुंद अवजड वाहन चालकांकडून यापूर्वी देखील अपघात घडून अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून अनेकांचे संसार उद्धवस्त झालेले आहेत. अशा बेकायदेशीर अवडज वाहनांवर त्वरीत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र वाहतुक सेना नंदुरबार जिल्हाध्यक्ष घारु कोळी यांनी केली आहे. तसे निवेदन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्यात आले आहे.**

निवेदनात आहे की, अवजड वाहन चालकांना विचारणा केली असता ते सांगतात की, आम्ही खालुन वरपर्यंत अधिकाऱ्यांना हप्ते देतो, आमचे कोणीही काहीही करु शकत नाही, तुमच्याकडून जे होत असेल ते करुन घ्या, अशी बेजबाबदारपणाची भाषा वापरतात. नंदुरबार हे जिल्ह्याचे ठिकाण असून येथे उपप्रादेशिक परिवहन विभागाचे स्वतंत्र कार्यालय असून तेथे मोठ्या प्रमाणावर अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक असूनही सदर अवजड वाहन चालकांकडून होणारी बेजबाबदारपणाची भाषा ही कोणाच्या वरदहस्ताने होते? याला आरटीओ प्रशासनाचा आर्शिवाद तर नाही ना? जर आरटीओ प्रशासनाचा आर्शिवाद नसेल तर मग त्यांच्यावर कारवाई का होत नाही? अवजड वाहन चालकांवर लवकरात लवकर कठोर कारवाई करावी अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.


## पाहिजेत

संपूर्ण भारतात शाखा असलेल्या व बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या श्री.रेणुकामाता मल्टीस्टेट या संस्थेत धुळे जिल्ह्यातील शाखांमध्ये खालील पदे भरायची आहेत.

| | |
|---|---|
| ✼ शाखा व्यवस्थापक<br>पात्रता : एम.कॉम/एम.ए./एम.एस्सी/एम.बी.ए. फाइनान्स<br>अनुभव : कमीत कमी ०७ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | २ जागा |
| ✼ सहायक शाखा व्यवस्थापक<br>पात्रता : एम.कॉम/एम.ए./एम.एस्सी/एम.बी.ए. फाइनान्स<br>अनुभव : कमीत कमी ०५ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ३ जागा |
| ✼ पासिंग ऑफिसर<br>पात्रता : एम.कॉम/एम.ए./एम.एस्सी/एम.बी.ए. फाइनान्स<br>अनुभव : कमीत कमी ०३ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ४ जागा |
| ✼ कॅशिअर<br>पात्रता : बी.कॉम/बी.ए./बी.एस्सी<br>अनुभव : कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ५ जागा |
| ✼ क्लार्क<br>पात्रता : बी.कॉम/बी.ए./बी.एस्सी<br>अनुभव : कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ७ जागा |
| ✼ मार्केटिंग क्लार्क<br>पात्रता : १० वी पास<br>अनुभव :कमीत कमी १ वर्षाचा मार्केटिंगचा क्षेत्रातील अनुभव आवश्यक | १० जागा |

इच्छुक उमेदवारांनी ७ दिवसांच्या आत खालील दिलेल्या मेल आयडी वरती आपला बायोडाटा व शैक्षणिक कागदपत्र पाठवावे.
मेल- callcentre@renukamatamultistate.com
recruitement@renukamatamultistate.com
मो.नं.९२२५३२०२८०
टीप : रिटायर कर्मचाऱ्यांना प्राधान्य (शासकीय व निमशासकीय)
प्रशासकीय अधिकारी
श्री.रेणुकामाता मल्टीस्टेट को.ऑप.अर्बन क्रेडिट सोसयटी लि.अहमदनगर

**घर भाड्याने देणे आहे**
१४६६/बी, स्वस्तिक सिनेमा मागे, शहा आणि कंपनीजवळ धुळे.
-: संपर्क :-
पिंगळे पेंटर
7588003981
7588003982

**त्वरीत पाहिजेत**
• बी.ई.सिव्हिल इंजि..२
• सुपरवायझर......१
• कार ड्रायव्हर..... १
- संपर्क -
सचिन डेव्हलपर्स
मो. नं. 94215 35249
98223 11149

**गाळे विकणे आहे**
२ गाळे विकणे आहेत.
स्वामी नारायण रोड, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
8626040405

**विकणे/भाड्याने देणे**
जयहिंद ज्युनीयर कॉलेज जवळ असलेल्या जयहिंद चौक येथील जयहिंद टॉवर या इमारतीतील पहिल्या मजल्यावर असलेली २५०० Sq. फूट जागा विकणे अथवा भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
९३२२८६८४६८

**विकणे आहे**
पेठ नं. ७, मालमत्ता क्र. १९९४ क्षेत्रफळ २२०.७० चौ. मी. (२३७५ चौ. फुट) २५ फुट फ्रंटेज असलेली २४ तास पाण्याची सोय, बिल्डर व डेव्हलपरसाठी उपयुक्त अशी योग्य, किंमत आल्यास विकणे आहे.
8793148475
वेळ : ११ ते २ सकाळी
५ ते ८ संध्याकाळी

**मिठाईचे जुने काऊंटर विकणे आहे**
मिठाईचे कोरियन डिझाइन काऊंटर–२ नग, नाश्ता (चाट) काऊंटर– १ नग मिठाईचे रेग्युलर काऊंटर– २ नग
-: संपर्क :-
8087744455

**विकणे आहे**
सेल्समन– १०
मॅनेजर – २
अकौन्टंट– १
इंग्रजी वाचता येणे आवश्यक किमान अनुभव २ वर्ष
पगार – १०–२५ हजार
-: संपर्क :-
7506000250

**प्लॉट विकणे आहे**
स.नं.८६, प्लॉट नं.२१ बिलाडी रोड, हायवे टच प्लॉट विकणे आहे.
देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9823336321

**विकणे आहे**
पेठ नं. १, ३१८१/२ए गल्ली नं. १. मामलेदार कचेरी समोर ५६ चौ. मीटर ,६०० चौ. फुट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
9423493562

**जमीन पाहिजे**
धुळे शहरालगत मुख्य रस्त्यास लागून एक ते दीड एकर जमीन धार्मिक-सामाजिक कामासाठी विकत घेणे आहे.
-: संपर्क :-
9403635907
9403088311

**पाहिजेत**
FACG Distubutur`s साठी ड्रायव्हर, डिलीवरी बॉय आणि माल सॉर्टींग करण्यासाठी Male/ Female पाहिजेत.
पत्ता : अग्रसेन चौक, मालेगावरोड, धुळे
8379882544

**घर भाड्याने देणे आहे**
सर्व सोयी युक्त घर भाड्याने देणे आहे
पत्ता : ६९, शिवप्रताप कॉलनी, नकाणेरोड, तुळशीराम नगर जवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
7775855624

**पाहिजे**
मेडीकल दुकानासाठी फार्मासिस्ट पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य.
पत्ता : चाळीसगाव रोड, सूर्य जीम जवळ
-: संपर्क :-
8888096777

**पाहिजेत**
लॉजिंग कामासाठी वेटर पाहिजे.
समक्ष भेटा!
सुयोग लॉज
संकल्प दातांच्या दवाखान्या शेजारी, दसेरा मैदान चौक, मालेगावरोड, धुळे

**भाड्याने देणे**
बार, किचन, लॉजिंग भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
9923044452

**पाहिजेत**
नवीन ऑफिस करिता मुला/मुलींची डायरेक्ट भरती
पात्रता- १० वी पास/नापास ते पदवीधर व १८ ते ३० वर्षे पगार ७५००/- ते २५०००/- हजार
रहाणे+जेवण मोफत
संपर्क :- पत्ता:- वाडीभोकर रोड, धुळे मो.९६५७६०८४५९

**विकणे आहे**
१) BPCL कंपनीचा पेट्रोल पंप मोंढाळे ता.पारोळा
२) शेती 2.5 एकर मोंढाळा ता.पारोळा येथे विकणे आहे
३) बिल्डींग 12x45 फूट ग.नं.५, जय जवान चौक योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
9422780383
7709522688

**५७ वर्षापासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...**
Authorised Dealer Panasonic LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

**- पाहिजेत -**
• नर्स/स्टाफ
• RMO
• Computer Operator
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**पाहिजेत**
धुळे एसटी स्टँड वरील पे अँड पार्किंगसाठी टू व्हीलर लावणे व काढून देण्यासाठी व बिलिंग मशीन ऑपरेटर कर्मचारी त्वरित पाहिजे. आकर्षक पगार.
-: संपर्क :-
9765229022

**पाहिजेत**
धुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेले झेरॉक्स दुकानाकरिता होतकरु व इमानदार मुलगा पाहिजे किंवा पूर्ण दुकान सांभाळणारे व्यक्ती अथवा परिवार पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक.
-: संपर्क :-
7798185687
9823083483

**पाहिजे**
कॅलेंडर वाटपासाठी मुले/माणूस पाहिजे जागा – ५. भेटा!
बंग एजन्सी
१२६८, आग्रारोड, धुळे

**पाहिजेत**
लॉजवर कामासाठी मॅनेजर, वेटर पाहिजेत.
समक्ष भेटा!
सकाळी १० ते १२, संध्या.५ ते ८
पारख लॉज
पुर्ती बिल्डींगजवळ, आग्रारोड, धुळे

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन कंपनीसाठी लेडी अकौन्टंट व मुलगा–२ साईट सुपरवायझर पाहिजे–२ अनुभव असल्यास प्राधान्य.
देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9422281845
8087738316


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०